# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३१५/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. शिशीरबाबा कवडूजी घोनमोडे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (प्रशा-३),**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,मुंबई -४०० ०३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,मुंबई -४०० ०३२

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०६.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००२५४८प्रकरणी आयोगाने दि.०५.०४.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी ज्यावेळी माहितीचा अर्ज सादर करण्यात आला होता त्यावेळची उपलब्ध माहिती अपिलार्थींना ५० पानापर्यंत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. असे करतेवेळी प्राथमिक चौकशी अहवालाची गोपनीयता ठेवण्यात यावी."*

२. उक्त आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांनी माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. १३.०४.२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. ०१.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (प्रशा- ३), शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (प्रशा- ३), शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून आयोगास दि. २३.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता (व्ही.सी.माध्यमाव्दारे) व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी यापुर्वी आयोगास सादर केलेला अहवाल दि. २३.०६.२०२२ आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, आयोगाच्या निर्देशाप्रमाणे दि. २२.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे.

..२/-

४. तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, त्यांना दि. २२.०६.२०२२ रोजीचे पत्र अप्राप्त आहे. सदर माहिती त्यांना ईमेलवर पाठविण्याची विनंती केली.

५. जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती दिलेली आहे. तरीही यापूर्वी पाठविलेली माहिती तक्रारकर्ता यांच्या ईमेल shishirg51@gmail.com वर तात्काळ पाठविण्यात यावी.

६. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**